महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १२० वा | दिनांक : ०४/०२/२०२५ | वार : मंगळवार

## हा शिवरायांची उंची कमी करण्याचा अश्लाघ्य प्रयत्न



**मुंबई** : अभिनेता राहुल सोलापूरकर यांनी नुकतेच छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल वादग्रस्त विधान केले होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी आग्र्याहून सुटका करून घेण्यासाठी मुघलांना लाच दिल्याचे ते म्हणाले. आता या विधानावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी राहुल सोलापूरकर यांना फैलावर घेतले आहे. शिवरायांबद्दल वक्तव्य करून, इतिहासाचे विकृतीकरण करणारा हा राहुल सोलापूरकर कोण? अशा शब्दांत आव्हाड यांनी तीव्र संताप व्यक्त केला.

अभिनेता राहुल सोलापूरकर यांनी एका मुलाखतीमध्ये बोलताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या आग्र्यातील सुटकेबाबत बरेच वादग्रस्त दावे केलेत. औरंगजेबाच्या वजिराला आणि त्याच्या बायकोलाही महाराजांनी लाच दिल्याचे ते म्हणालेत. सोलापूरकरांचा हा व्हिडिओ समोर आल्यानंतर सोशल मीडियावर अनेक जणांनी संतप्त प्रतिक्रिया दिल्या आहेत. जितेंद्र आव्हाड यांनीही सोशल मीडिया एक्सवर पोस्ट करत राहुल सोलापूरकर यांचा समाचार घेतला.

हिरकणी झालीच नव्हती. हिरकणी नावाचे व्यक्तिमत्व अस्तित्वातच नव्हते. छत्रपती शिवाजी महाराज हे आग्र्याहून लाच देऊन निघाले, अशा पद्धतीने इतिहासाचे विकृतीकरण करणारा हा राहुल सोलापूरकर कोण महामूर्ख? हा मुर्ख माणूस सध्या महाराष्ट्राला इतिहासाचे डोस पाजतोय, अशा शब्दात जितेंद्र आव्हाड यांनी राहुल सोलापूरकर यांच्यावर सडकून टीका केली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांची उंची कमी करण्याचा हा अश्लाघ्य प्रयत्न अशा या फडतूस माणसांकडून केला जातोय, त्याचा निषेध करावा तेवढा कमीच आहे. या महामुर्खाने आपल्या तोंडाला टाळे लावावे, असेही आव्हाड म्हणाले. शिवप्रेमी हे फार सहन करणार नाहीत अन् हिरकणी बुरूज कुठे आहे, हे याला रायगडावर नेऊन दाखवावे लागेल, असे जितेंद्र आव्हाड यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे.

दरम्यान, ठाकरे गटाचे नेते आणि अभिनेते किरण माने यांनीही राहुल सोलापूरकर यांना खडेबोल सुनावले होते. अशाप्रकारच्या लोकांनी आपली मराठी इंडस्ट्री खच्चून भरलेली आहे! असल्या टुकारांना शाहु महाराजांच्या भूमिका दिल्या गेल्या, तरी यांच्या मेंदूतले शेण तसेच आहे. विनोद म्हणजे शिवरायांची बदनामी करण्याच्या नादात स्वत:ला शिवशाहीर म्हणवून घेणाऱ्या एका इतिहासद्रोह्यालाही याने खोटे ठरवले, असा घणाघात किरण माने यांनी केला. कडेकोट बंदोबस्तात तुरुंगात असताना महाराज पैसे चारतात आणि त्यांना 'लाच दिली' असे अधिकृत शिक्क्याचे परवाने मिळतात, असा अनागोंदी कारभार चालायला ते ईव्हिएम घोटाळ्याने सत्तेत आलेले सरकार होते की काय? असाही प्रश्न किरण माने यांनी विचारला.

## निवडणुकीपूर्वी धनंजय मुंडे रात्री दोन वाजता येत पाया पडले - मनोज जरांगे



**छत्रपती संभाजीनगर** : विधानसभा निवडणुकीपूर्वी धनंजय मुंडे यांचे ८ दिवस मला फोन आले. एकदिवस रात्री दोन वाजता मला भेटायला आले आणि मला सांभाळून घ्या म्हणत माझ्या पाया पडले, तेव्हा वाल्मीक कराड त्यांच्या सोबत होता, असा दावा मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे.

मनोज जरांगे पुढे बोलताना म्हणाले की, धनंजय मुंडेंनी मला कराडची ओळख करुण दिली, तेव्हा मी त्यांना म्हटलो की हर्व्हेस्टरचे पैसे बुडवणारा हाच का? त्यावर त्यांनी म्हटले लक्ष राहु द्या, मराठ्यांनी मला मोठं केले, असे म्हणत जाताना पाया पडल्याचाही दावा त्यांनी केला.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, देशमुखांची हत्या करणारी टोळी विचित्र आहे. ती टोळी संपलीच पाहिजे. फरार आरोपी कृष्णा आंधळेला यांनी पळवले, असे वाटत आहे. खंडणी मागणारी, खून करणारी, छेडछाड करणारी, घर बळकवणारी, जमीन बळकवणारी, अशा वेगवेगळ्या टोळ्या आहेत. या पैशांवर राजकारण करायला मजा वाटली. संपूर्ण संपत्ती एखाद्या मंत्र्याची आहे. वाल्मीक कराडला इतक्या पैशांचे काय करायचे?, असा सवालही त्यांनी यावेळी उपस्थित केला आहे.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, महंत नामदेवशास्त्री यांचे सर्व उघड पडत आहे, जे बोलायचे आहे ते बोलून गेले, टोळीने दाखवले किती जातीवाद असतो. असे जातीवादी शब्द महाराष्ट्राने पहिल्यांदाच ऐकले आहेत. आरोपींचे समर्थन करणारे शब्द महाराष्ट्राचे नुकसान करणारे आहे, पोटातील ओठावर आले. बाबाला दोष देत नाही, करून घेणारी टोळी आहे. स्वतः साठी देवधर्म कळेना. काही लोकांनी ओबीसीच्या नावाखाली अन्यथा सहन केला. ओबीसी असून देखील त्यांच्यावर अन्याय झाला.आता लोक व्यक्त होत आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002

## सर्वच शासकीय कार्यालयांमध्ये मराठी बोलणे अनिवार्य, विरोध केल्यास होणार कारवाई

**मुंबई** : राज्यात देवेंद्र फडणवीस सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मराठी भाषा संवर्धनासाठी आता सर्वच शासकीय, निमशासकीय व महापालिका कार्यालयांमध्ये मराठी बोलणे अनिवार्य असणार आहे. तसेच या कार्यालयात मराठी भाषेत बोलण्याबद्दल दर्शनी भागात फलक लावावा लागणार आहे. शासकीय कार्यालयातील संगणकावरील कळफलक सुद्धा मराठी भाषेतच असणार आहेत. इतकेच नव्हे तर मराठी भाषेचा वापर करण्यास नकार देणाऱ्यांवर देखील शिस्तभंगाची कारवाई केली जाणार असल्यासंदर्भात शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

मराठी भाषेचे जतन, संवर्धन, प्रचार, प्रसार व विकास होण्याच्या अनुषंगाने केवळ शिक्षणाचेच नव्हे तर सर्व लोकव्यवहाराचे होता होईल तेवढे मराठीकरण होणे आवश्यक आहे. त्यासाठी संवाद, संपर्क आणि सर्व स्तरावरील व्यवहारासाठी मराठी भाषेचा वापर करणे आवश्यक आहे, ही बाब लक्षात घेऊन मराठी भाषा धोरणामध्ये व्यवहारक्षेत्र निहाय शिफारसी अंतर्भूत आहेत. मराठी भाषेस येत्या २५ वर्षामध्ये ज्ञानभाषा व रोजगाराची भाषा म्हणून प्रस्थापित करणे हे शासनाच्या सदर धोरणाचे अन्य उद्दिष्टांसह प्रमुख उद्दिष्ट आहे.

केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्यानंतर आता राज्य सरकारकडून देखील मराठी भाषेला अधिक सक्षमपणे व प्रभावीपणे रुजवण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे दिसत आहे. तसेच आता या धोरणात शालेय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण, संगणक शिक्षण, विधी व न्याय व्यवहार, वित्त व उद्योजगत, प्रसारमाध्यमे, प्रशासनात मराठी भाषेचा वापर इत्यादी व्यवहारक्षेत्रनिहाय सविस्तर शिफारशी प्रस्तावित आहेत. त्यानुसार, महाराष्ट्र राज्यात शासकीय खरेदी व शासकीय अनुदानातून खरेदी केल्या जाणाऱ्या संगणक कळफलकांवरील छापील अक्षर कळमुद्रा रोमन लिपीबरोबरच मराठी देवनागरी लिपीत असणे अनिवार्य आहे.

सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, शासन महामंडळे, शासन अनुदानित कार्यालयांमध्ये येणाऱ्या सर्वांनीच मराठी भाषेमधून संभाषण करणे अनिवार्य असेल. तसेच मराठी भाषेचा वापर व मराठीमध्ये संभाषण करण्याबाबत कार्यालयांमध्ये दर्शनी भागात फलक लावणेही अनिवार्य असेल. याबाबतची अंमलबजावणी काटेकोरपणे होईल, असेही या आदेशात म्हटले आहे.

शासकीय कार्यालयांमध्ये मराठी भाषेत संभाषण न करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांच्या विरोधात कार्यालय प्रमुख वा विभागप्रमुखांडे तक्रार करता येणार आहे. तसेच यात अधिकारी किंवा कर्मचारी दोषी आढळून आल्यास त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही केली जाणार आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०४ फेब्रुवारी २०२५


## हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनतर्फेबक्षीस वितरण व आदर्श शिक्षक पुरस्कार सन्मान सोहळा थाटात संपन्न!




**छत्रपती संभाजीनगर** : सालाबादप्रमाणे सलग ११व्या वर्षीही हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनतर्फे शिक्षकांसाठी ईद ए मिलादुन्नबीनिमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये विजेत्यांना पारितोषिक व ट्रॉफीचे वितरण करण्यात आले तसेच शिक्षकांमधून उत्कृष्ट शैक्षणिक करू करणाऱ्या शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमचे मार्गदर्शक तसेच छत्रपती संभाजीनगर विभागाचे शिक्षक आमदार श्री.विक्रमजी काळे साहेब, तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी श्रीमती जयश्री चव्हाण मॅम, माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी श्रीमती अश्विनी लाटकर मॅम, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्री. सोफी अहमद लइक, शहराचे प्रसिद्ध वकील ॲड. खिजर पटेल साहेब, प्रमुख उपस्थिती सिल्लोडचे माजी नगरसेवक कॉ. शेख बाबू आदी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात कुराण पठणाने तर कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीत गायनाने झाली. सर्वप्रथम सर्व प्रमुख पाहुण्यांचे हॅप्पी टू हेल्प फॉउंडेशनच्या परंपरेनुसार सर्वाना पुस्तक व शाल आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आले. प्रथम ईद मिलादुन्नबी निमित्त घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय निबंध स्पर्धेतील अनुक्रमाने प्रथम, द्वितीय आणि तृतीय विजेत्यांना एक पुस्तक, शानदार ट्राफी, सन्मान पत्र व रोख रक्कमेचे बक्षिसे देण्यात आली. तसेच या वर्षी ४ प्रोत्साहनपर बक्षिसे अनुक्रमे देण्यात आले. राज्यस्तरीय आदर्श शिक्षक-शिक्षिका पुरस्कार २०२४ राज्यातून ८ शिक्षकांना देण्यात आले. तसेच ८ शिक्षकांना जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार वाटप करण्यात आले. सर्व पुरस्कार प्राप्त शिक्षक-शिक्षिकांना मान्यवराच्या हस्ते शानदार ट्राफी, सन्मान पत्र एक पुस्तक आणि शाल देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रम मौलाना आझाद संशोधन केंद्र, टीव्ही सेंटर, छत्रपती संभाजीनगर येथे हा सोहळा थाटात व मोठ्या उत्साहात पार पडला,कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन सय्यद मुंतजिब चिश्ती सर यांनी केले तर प्रास्ताविक संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम सर यांनी केले. अध्यक्षीय मार्गदर्शनपर भाषणात शिक्षक आमदार श्री.विक्रमजी काळे, शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक यांचे मार्गदर्शनपर भाषण झाले. अध्यक्षीय भाषणात शिक्षक आमदार म्हणाले की हॅप्पी टू हेल्प फॉउंडेशनचे प्रत्येक कार्य सर्वांना प्रेरणादायी आहे तसेच शिक्षकांनी आपली जबाबदारी खंबीरपणे पाळावी. हॅप्पी टू हेल्प फॉउंडेशनच्या सर्व टीम व विशेषकरून रहीम सरांचे अभिनंदन करत ते म्हणाले की त्यांनी इतके चांगले उपक्रम यशस्वीपणे राबविलेले आहेत. हे शिक्षकांना प्रेरणा देण्याचे कार्य ११वर्षापासून करीत ते करीत आहेत. मी खंबीरपणे हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशनच्या सोबत आहे. आभार प्रदर्शन शफिक पठाण सर यांनी केले. या कार्यक्रमामध्ये शिक्षक - शिक्षिका, मित्र परिवार तसेच शैक्षणिक कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमानंतर सर्व शिक्षक-शिक्षिकांनी जेवणाचा आस्वाद घेतला.या भव्यदिव्य कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम, शेख शब्बीर ,शफीक पठाण, सय्यद ताजीम,शाहरुख पठाण, ॲड. इरफान खान, शेख जफर, शेख साबीर, शेख यासेर, फरमान खान, शेख अलीम, शाहीन नाज, फैसल खान अहेमद, इम्रान खान, अरमान शेख, सय्यद तसलीम, शेख अजहर, शारेक सय्यद, रिजवान, आदींनी प्रयत्न केले...

"अल्लाहच्या कृपेने कार्यक्रम यशस्वी झाला याचा मला अभिमान आहे या कार्यक्रमामुळे आमचा विश्वास वाढला आहे व् आम्ही सर्व शिक्षक- शिक्षिकांचे तसेच आम्हाला मदत करणारे व आम्हाला जीव लावणाऱ्या मित्र मंडळाचे सदैव आभारी राहीन व आपल्या सेवेसाठी २४ तास हज़र राहीन याची ग्वाही देतो" - आपला मित्र शेख अब्दुल रहीम

## अर्थव्यवस्थेला गति -शक्ती देणारा अर्थसंकल्प प्रा.डॉ भागवत सुखदेव परकाळ



**अहिल्यानगर** : अर्थशास्त्र विभाग अहमदनगर महाविद्यालय अहिल्यानगर आजच्या अर्थसंकल्प सदर करते वेळी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थव्यवस्थेतील सर्व घटकांना कोणत्या ना कोणत्या स्वरूपाचीतरतूद केली या संकल्पाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्थव्यवस्थे मधील विविध क्षेत्र कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्रातील उत्पादकता वाढवणे वर लक्ष केंद्रीत केले. म्हणजेच अर्थव्यवस्थेतील एकूण पुरवठा विस्तार करणे आणि दुसऱ्या बाजूने विविध क्षेत्रासाठी विविध स्वरूपाच्या करात आणि उत्पन्ना सूट देऊन खर्च योग्य उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला आहे .म्हणजेच अर्थव्यवस्थेतील मागणी विस्ताराचा विचार त्यांनी केलेला आहे .या दोन्ही गोष्टीमुळे अर्थचक्राना गती प्राप्त होऊन अर्थव्यवस्थेतला गती- शक्ती प्राप्ती होणार आहे

## विकास कामांना नीधी देण्याची आ. संजनाताई जाधव यांच्याकडे मागणी



**कन्नड (अरुण थोरात)** : कळंकी ता. कन्नड येथील विविध विकास कामांना मंजूरी व भरघोस नीधी देण्याची मागणी माजी उपसरपंच तथा ग्रा.पंचायत सदस्या शितल थोरात यांनी आ. संजनाताई जाधव यांच्या कडे केली आहे.याबाबत आ.संजनाताई जाधव यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कळंकी हे गाव दुर्गम डोंगराळ अशा मराठवाड्या च्या सीमेवर वसले असून, मुलभूत सुविधां पासून वंचित आहे. गावाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी जिल्हा परिषद शाळेस पेवर ब्लॉक, शाळा खोली, गाव अंतर्गत सिमेंट कॉंक्रीट रस्ते, गावासाठी सामाजिक सभागृह व मंगल कार्यालय ईमारत, छत्रपती शिवाजी महाराज स्मारकास संरक्षण भींत, कळंकी ते वडनेर ग्रा.मा. २७१ चे मजबूती व डांबरीकरण, कळंकी ते कोळवाडी जि.प्र.मा २५ चे संपुर्ण डांबरीकरण, चिवळी ते कळंकी रस्त्याचे अपूर्ण काम पूर्ण करणे, जलजिवन मिशन अंतर्गत अपुर्ण कामे पुर्ण करणे, गावातील बिएसएनएल मोबाईल टावर ला ऑप्टिकल फायबर केबल जोडणी, स्मशानभूमी शेड व सुशोभीकरण, आदिवासी ठाकर समाज सभागृहास वालकंपाऊंट, दलित वस्ती साठी स्मशानभूमी व इतर सुविधा, आदी विकासकामे मंजूर करुण विकास नीधी देण्याची मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.


इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com
साहिल
कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स
• डी.टी.पी.जॉब वर्क
• मराठी, हिंदी, इंग्रजी
• एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
• स्पायरल / हार्ड बाईन्डींग
• लॅमिनेशन
• कलर प्रिंट
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०४ फेब्रुवारी २०२५


## नाईक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सुविधा पुरवा, टवाळखोरांना आवर घाला रिपब्लिकन विद्यार्थी सेनेची मागणी



**छ. संभाजीनगर :** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा पासून वंचित ठेवण्यात येत असून सुरक्षेच्या दृष्टीनेही महाविद्यालयात प्रशासन हे अत्यंत निष्काळजीपणाने वागत असल्याचा आरोप करून रिपब्लिकन विद्यार्थी सेनेचे सचिन निकम यांनी वसंतराव नाईक महाविद्यालय प्रशासनाला धारेवर धरत विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा द्या अन्यथा तीव्र आंदोलन करू असा इशारा दिला आहे. याबाबत त्यांनी प्राचार्य डॉ.संजय शिंदे यांना निवेदन सोपविले असून आपले महाविद्यालय हे अनुदानित महाविद्यालय आहे शिवाय सर्व सुविधा पुरविणे आपणास बंधनकारक आहे विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सुविधांसाठी शासनाचे विविध अनुदान देखील आपणांस मिळत असतांना पिण्याचे पाणी, शौचालय अश्या मूलभूत सुविधा पुरविण्यास महाविद्यालय प्रशासन अपयशी ठरले असल्याने विद्यार्थ्यांना असुविधेचा सामना करावा लागत आहे याकडे लक्ष वेधले.

दि.२६ डिसेंबर रोजी आपल्या महाविद्यालयाच्या प्रांगणात एका विद्यार्थ्याला टवाळखोर तरुणांनी बेदम मारहाण केली तसेच त्याचे चित्रीकरण करणाऱ्या पत्रकारालाही बेदम मारहाण करण्यात आल्याने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न चव्हाट्यावर आला आहे परंतु त्यावर अंकुश निर्माण करण्यात आपण अयशस्वी ठरला हे गंभीर असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची जबाबदारी कोण घेणार असा सवाल उपस्थित केला आहे.महाविद्यालयात सतत बाहेरील टवाळखोरांचा मोठ्या प्रमाणात वावर असल्याने विद्यार्थी भयभीत झालेले आहेत महाविद्यालयाच्या दोन्ही प्रवेशद्वारातून थेट टवाळखोर येजा करत असतात तेथे सुरक्षा रक्षकही नेमण्यात आलेला नाही,महाविद्यालयात शौचालय, पिण्याचे पाणी, जेवणासाठीची जागा नसल्याने विद्यार्थ्यांना महाविद्यालयाबाहेर जावे लागते.

महाविद्यालयात उपहारगृह देखील नसल्याने नाश्ता, चहापाण्यासारखी सुविधा देखील उपलब्ध होत नसल्याने या समस्या तात्काळ सोडवाव्यात असे सांगत विद्यार्थ्यांना किमान मूलभूत सुविधा पुरवून सुरक्षेच्या दृष्टीने ठोस उपाययोजना कराव्यात अन्यथा रिपब्लिकन विद्यार्थी सेनेच्या वतीने या विरोधात लोकशाही मार्गाने अवलंब करण्यात असा इशारा दिला आहे.

## जिल्हा शिवजयंती महोत्सव समिती २०२५ च्या अध्यक्षपदी डॉ. बाळासाहेब थोरात यांची निवड जाहीर



**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा शिवजयंती महोत्सव समितीची एक व्यापक बैठक या समितीचे संस्थापक अध्यक्ष पृथ्वीराजभाऊ पवार यांचे अध्यक्षते खाली शनिवार १ फेब्रुवारी २०२५ रोजी सिडको भागात पार पडली त्यावेळी सर्वानुमते जिल्हा शिवजयंती महोत्सव समितीच्या अध्यक्ष पदी डॉ.बाळासाहेब थोरात यांची निवड जाहीर करण्यात आली असुन पुढील व्यापक कार्यकारिणी घोषीत करण्याचे अधीकार त्यांना प्रदान करण्यात आले.

या प्रसंगी बोलतांना या समितीचे संस्थापक पृथ्वीराज भाउ पवार म्हणाले की,छत्रपती शिवाजी महाराजांचे नावघेतल्या नंतर वीरश्री संचार करणार नाही असे होणे नाही. रयतेचा राजा म्हणून लोकांच्या मनामनात छत्रपतीनी अधिराज्य गाजवले आहे.अशा छत्रपती शिवरायांना कधीच विसरता येणार नाही.त्याकाळी आपल्या शहरातील परिस्थिती अंत्यंत प्रतिकुल होती.अशा प्रतिकुल परिस्थिती मध्ये सामाजीक व जातीय सलोखा कायम रहावा यासाठी पुढाकार घेतसर्वधर्मीय, सर्वपक्षीय अशी शिवजयंती महोत्सव समिती बनवुन शहरा मध्ये शांतता निर्माण केली. या वर्षीचे हे ५६ वे वर्ष असुन जिल्हा शिवजयंती महोत्सव समिती च्या पारंपरिक पद्धतीने प्रत्येक पक्षाला अध्यक्षपदाचा मान देण्यात येत असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

डॉ .बाळासाहेब थोरात यांचे नांव अध्यक्षपदा करीता माजी अध्यक्ष जगन्नाथ काळे यांनी सुचवले केले तर त्यास माजी अध्यक्ष अभिजीत देशमुख यांनी सर्वांच्या वतीने अनुमोदन दिले. वर्ष २०२४ चा कार्य अहवाल मावळते अध्यक्ष अनिल बोरसे यांनी बैठकीत सादर केला व त्यांनी नमुद केले की, माझेवर अध्यक्ष पदाची जवाबदारी देउन मला सर्वच शिवभक्त,विविध पक्षांचे मान्यवर नेते, जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन व मनपा प्रशासन यांनी प्रचंड मोठे सहकार्य केल्या मुळे हे कार्य पार पाडता आले म्हणून मी सर्वांचे शत:श आभार व्यक्त करतो.

या कार्यक्रमाचे सूत्र संचालन व प्रास्ताविक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी करतांना शिवजयंती महोत्सव समितीचे ध्येय धोरणे व ऐतिहासिक व्यापक बाबी उपस्थित समोर विशद केल्या.कार्यक्रमाचे आभार डी एन पाटील यांनी व्यक्त केले.या व्यापक बैठकीसाठी संस्थापक अध्यक्ष पुथ्वीराजभाऊ पवार, तनसुख झांबड,पंकज फुलफगर, प्रकाश मुगदीया डी एन पाटील,डॉ.राजेंद्र दाते पाटील,अभिजीत देशमुख, विनोद पाटील,राजेंद्र जंजाळ, विजय औताडे,राजेंद्र दानवे, मनोज पाटील,सिद्धांत शिरसाट, अभिषेक देशमुख,अनिल बोरसे सुमित खांबेकर, विजय वाघचौरे, राजु शिंदे, हर्षवर्धन कराड, किशोर तुळशीबागवाले,प्रमोद नरवडे,अनिकेत पवार,संदीप शेळके,हरिष शिंदे,विशाल दाभाडे,राजु पारगावकर, शिवराज नरवडे आदी मान्यवर उपस्थित होते.






## राष्ट्रीय पातळीवरील अबॅकस स्पर्धेत काव्या काळे प्रथम




**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर येथील गारखेडा क्रिडा संकुल येथे झालेल्या अबॅकस (National Level Competation) च्या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत कु.काव्या किशोर काळे हिने अबॅकस (G-Champ Abacus and Brainn Gym) मध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक /ट्रॉफी मिळविले. त्याबद्दल तिचा सत्कार करण्यात आला. G-Champ अबॅकस अकॅडमीच्या केंद्र संचालक कल्याणी अंकुशकर यांचेही कौतुक करण्यात आले. त्यांना देखील "उत्कृष्ट अवॉर्ड" देऊन सन्मानित करण्यात आले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०४ फेब्रुवारी २०२५


## शिवाजी महाविद्यालयात राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत यश पाटील प्रथम



**कन्नड (अरुण थोरात):** येथील शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात दि. ३ फेब्रुवारी रोजी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा संपन्न झाली. लोकनेते सहकार महर्षी बाळासाहेब पवार आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा असे स्पर्धेचे नाव आहे. ही स्पर्धा कन्नडचे भूमिपुत्र व महाराष्ट्रातील नामवंत नेते स्व. बाळासाहेब पवार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी घेण्यात येते. स्पर्धेचे हे नववे वर्ष आहे. आतापर्यंत वेगवेगळ्या विषयावर ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. यावर्षी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) संधी की आव्हान असा विषय स्पर्धकांना देण्यात आला होता. या स्पर्धेचे उद्घाटन संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष व पैठण येथील प्रतिष्ठान महाविद्यालयाच्या मराठी विभागाचे प्रमुख सर्जेरावजी जिगे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रा. जिगे यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संत तुकाराम महाराजांच्या उक्तीचे उदाहरण देऊन विद्यार्थ्यांसाठी शब्दच धनसंपदा व शब्दच खरी रत्न आहेत असे उद्गार काढले. विद्यार्थ्यांनी शब्दांचीच पूजा करावी, शब्दांचाच जागर करावा व आपले जीवन संपन्न करावे असे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी त्यांनी ज्यांच्या नावाने ही स्पर्धा चालते असे लोकनेते बाळासाहेब पवार यांच्या सामाजिक कार्याची आठवण काढली व त्यांच्या कार्याचा गौरव पूर्ण उल्लेख केला. जालना जिल्ह्यातील सामान्य शेतकरी कुटुंब स्व. बाळासाहेब पवार यांनी केलेल्या महान कार्यामुळे त्यांचे छायाचित्र घरात लावायचे ही आठवण त्यांनी काढली. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी केला. त्यांनीही लोकनेते बाळासाहेब पवार यांनी मराठवाड्यासाठी केलेल्या महान कार्याची आठवण केली व विद्यार्थ्यांनी त्यांच्यासारखे गुण अंगी बाळगावे असे आवाहन केले. याप्रसंगी फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य राहुल क्षीरसागर, शिवाजी महाविद्यालयाचे उपप्राचार्य भाऊसाहेब मगर, भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य अभय आहेर, सेवानिवृत्त प्राध्यापक अंबादास सगट उपस्थित होते. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून केशवचंद राठोड, भगवान ठाकरे, एड. प्रतिक्षा देवगुडे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागाचे प्रमुख प्रो. शिवाजी हुसे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. रामचंद्र झाडे यांनी केले तर आभार प्रा. कारभारी भानुसे यांनी मानले.

या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील वेगवेगळ्या ठिकाणाहून २५ हून अधिक संघांनी सहभाग नोंदवला. यामध्ये प्रामुख्याने वझे महाविद्यालय मुंबई, फर्ग्युसन महाविद्यालय पुणे, नागपूर, अहिल्यानगर, संगमनेर, चाळीसगाव, श्रीरामपूर, संभाजीनगर आदि ठिकाणाहून विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. कृत्रिम बुद्धिमत्ता संधी की आवाहन या विषयावर विद्यार्थ्यांनी अत्यंत गंभीर व सखोल विचार व्यक्त केले. या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे पुरस्कार वितरण डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगरचे प्र. कुलगुरु वाल्मीक सरवदे यांच्या हस्ते पार पडले. बक्षीस वितरण समारंभ प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रा. वाल्मीक सरोदे यांनी विद्यार्थ्यांना नव्या जगात टिकायचे असेल तर तंत्रज्ञानाची कास धरावीच लागेल असा संदेश दिला. त्यासाठी वक्तृत्व स्पर्धेत ठेवलेला विषय अत्यंत समयोचीत आहे असे ते म्हणाले. आपल्या आसपास होणाऱ्या बदलांचे सूक्ष्म निरीक्षण करून त्यानुसार आपण आपल्या व्यक्तिमत्त्वात बदल घडवावेत असे आवाहन त्यांनी केले. शिवाजी महाविद्यालयाकडून आयोजित करण्यात येणाऱ्या विविध शिक्षण पूरक क्रियाकलापांचे त्यांनी कौतुक केले व वक्तृत्व स्पर्धेसारख्या कौशल्य पूरक आयोजनाबद्दल त्यांनी महाविद्यालयाचे अभिनंदन केले.

या समारंभाचे अध्यक्षस्थान छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष अशोकराव आहेर यांनी भूषवले. या स्पर्धेतील विजेत्यांचे संस्थेचे अध्यक्ष मानसिंह पवार व सर्व संचालक मंडळाने अभिनंदन केले. स्पर्धेचा निकाल खालील प्रमाणे. प्रथम क्रमांक -यश रवींद्र पाटील- महात्मा फुले महाविद्यालय पनवेल, द्वितीय क्रमांक -अनिकेत रामा वनारे - संताजी महाविद्यालय नागपूर, तृतीय क्रमांक -कुमारी वडवणीकर अक्षता दत्तात्रय- होमीओपेथिक मेडीकल कॉलेज अहिल्यानगर, उत्तेजनार्थ एक- बोडखे आकाश वसंत -श्री ओंकारनाथ मालपाणी महाविद्यालय संगमनेर, उत्तेजनार्थ दोन - खरात स्वप्नील सोपान -माणिकचंद पहाडे विधि महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर.

## प्रयागराज कुंभमेळयात शांतिगिरी महाराजांना 'जगद्‌गुरू' उपाधी बहाल



**खुलताबाद : (प्रा. योगेश रावते)** वेरूळ येथील श्री संत जनार्दन स्वामी (मौनगिरी) महाराज यांचे उत्तराधिकारी श्री. श्री.१००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरीजी महाराज यांचा 'जगद्गुरु' उपाधीने सन्मान करण्यात आला. श्री शंभू पंच दशनाम जुना आखाड्याचे महंत हरीगिरीजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थित व महामंडलेश्वर स्वामी अवधेशानंदगिरीजी महाराज यांच्या शुभहस्ते जगद्गुरु पदाचा पट्टाभिषेक सोहळा कुंभमेळयात रविवारी पार पडला. जुना आखाड्याने जगद्गुरु पदवी बहाल केलेले प.पु.शांतिगिरी महाराज हे महाराष्ट्रातील पहिले संत होत. श्री. संत जनार्दन स्वामींच्या विविध परंपरा ते जोमाने पुढे नेत आहेत त्यांचे भारतभर जवळपास १०८आश्रम असून त्यांच्या या अतुलनीय कार्याची दखल घेत त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

## विद्यापीठात इतिहास महोत्सव व प्रा.आर. एस. गुप्ते व्याख्यानमालेचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा हा इतिहास व समृद्ध संस्कृतीचा वारसा लाभलेला भूभाग आहे. प्राचीन, मध्ययुगीन ने आधुनिक दख्खनच्या जडण-घडणीत त्याचा महत्वाचा वाटा राहिला आहे. महाराष्ट्राच्या साहित्य, संस्कृती व परंपरेचा तो आधार राहिला आहे. मराठवाडयाच्या या संपन्न वारशाचे जतन, संवर्धन, संशोधन व प्रसार करण्याचे कार्य इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती विभाग त्याच्या स्थापनेपासून करत आलेला आहे. शास्त्रशुद्ध चौकटीत इतिहास अध्ययन, अध्यापन व संशोधन करणे. इतिहासविचारातील विवेक जनसामान्यांपर्यंत रूजवणे. यासाठी इतिहास विभाग अनेक प्रकारचे उपक्रम राबवत आलेला आहे. त्याचाच एक भाग म्हणून दि. ०४-०५ फेब्रुवारी २०२५ रोजी इतिहास महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. इतिहास महोत्सवात आपण सहभागी व्हावे असे इतिहास विभाग प्रमुख प्रा. पुष्पा गायकवाड यांनी केले आहे. या महोत्सव अंतर्गत प्रा. आर. एस. गुप्ते व्याख्यानमाला होत आहे. याचे उद्घाटन (डॉ.) विजय फुलारी कुलगुरू, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या हस्ते होत आहे. पुष्प पहिले दि.४ फेब्रुवारी रोजी वेळ : स.११:३० ला गुंफणार आहे. तर, "मराठवाड्यातील प्राचीन व पूर्वमध्ययुगीन मंदिरांची कला आणि स्थापत्य" या विषयावर वक्ते डॉ. माया पाटील (निवृत्त प्रा., प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती व पुरातत्व विभाग, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर विद्यापीठ, सोलापूर) या गुफणार आहे. दूसरे पुष्प दू.३ वाजता "मराठवाड्यातील कोरीव बौद्ध लेण्यांचा ऐतिहासिक विकास" या विषयावर : डॉ. श्रीकांत गणवीर , डेक्कन कॉलेज,पुणे हे गुफणार आहे. तिसरे पुष्प दि. ५ फेब्रुवारी रोजी सकाळी ११:३० वा.: मराठवाडा इ.स. १७२४-१९४८ राजकीय सामाजिक व साहित्याच्या विशेष संदर्भात डॉ. अवदेश राणी बावा (निवृत्त प्राध्यापक), उर्दू विभाग, केंद्रीय विद्यापीठ, हैद्राबाद हे गुंफणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. शिवकुमार पाटील,माजी अध्यक्ष, इतिहास अभ्यास मंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर हे असणार आहे हा कार्यक्रम विध्यापीठातील इतिहास वस्तुसंग्रहालय येथे होणार आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०४ फेब्रुवारी २०२५


## आनंदबाई कोल्हे प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात साजरे




**कन्नड (प्रतिनिधी राहुल थेटे)** : कन्नड शहरातील आनंदीबाई कोल्हे प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेह , संम्मेलन मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. दिनांक ३० जानेवारी रोजी आनंद नगरीचे उद्घाटन गटशिक्षणाधिकारी श्री श्रीमाळ यांचा हस्ते संपन्न झाले त्याचबरोबर दिनांक ३१ जानेवारी रोजी सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले. सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन अग्रसेन बँकेचे संचालक बाकीचं फकीरचंदजी पांडे यांच्या हस्ते करण्यात आले.

सांस्कृतिक कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांनी कोळी गीत, देशभक्ती पर गीत, भारुड, छत्रपती शिवाजी महाराज, नाटिका, तसेच सध्या चर्चा सुरू असलेल्या प्रयागराजला सुरू असलेल्या कुंभमेळा यावर आधारित शिव गीतांवर विद्यार्थी यांनी सादर केले नृत्य. विद्यार्थिनी यावेळी आकर्षित अशी नृत्यांवर उत्कृष अशी वेशभूषा धारण करून पालकांना व इतर नागरिकांना आकर्षित केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कन्नड राष्ट्रवादी काँग्रेस नेते तथा संस्थेचे अध्यक्ष संतोष किसनराव कोल्हे यांनी केले. कार्यक्रमासाठी केंद्रप्रमुख बी.ए ताठे, शिक्षण विस्तारअधिकारी सुनीता वेरूळकर, वकील संघाचे मा. तालुकाध्यक्ष कृष्णकांत जाधव, सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी अरुण मुळे, फकीरराव दाबके, उप प्राचार्य एस. बी मतसागर, सरपंच विनायक सोनवणे, राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक शहराध्यक्ष शरीफ खा नुरखा पठाण, जे .आर अकोलकर, एकनाथराव डहाके, अशोकराव गायकवाड, चंद्रभान मोठे, दिलीपराव वाळूजे, ज्ञानेश्वर गाडेकर,बापू बिरारे, नगरसेवक अनिल गायकवाड, नगरसेविका उलफतबी पटेल, विद्याताई काशिनंद, मंगलबाई वाघ, सोनम अनिल गायकवाड,किशोर राजगुरू. आदींसह पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे आभार मुख्याध्यापिका संगीता कोल्हे यांनी केले.

## डॉ. झाकीर हुसेन उर्दु हायस्कूल मध्ये स्वयंशासन दिन उत्साहात साजरा




उर्दू हायस्कूलमध्ये स्वयंशासन दिन साजरा करताना शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व स्वयंशासन दिनाचे मुख्याध्यापक, सहशिक्षक व अन्य.

**उमरगा, (सुधीर पंचगल्ले)** : येथील डॉ. झाकीर हुसेन उर्दु हायस्कूल मध्ये सोमवारी (ता.३) रोजी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्वंयशासन दिन हा उपक्रम शिस्तबद्ध आणि खेळीमेळीत संपन्न झाला. या दिनी विद्यार्थ्यांनी शालेय प्रशासनाचा अनुभव तर घेतलाच पण शिक्षक म्हणून अध्यापन करताना विद्यार्थ्यासमोर प्रत्येक शब्द किती जबाबदारीने वापरावा लागतो. हा अनुभवही तितकाच महत्वाचा ठरला, असे मनोगत शिक्षकरूपी विद्यार्थिनीनी व्यक्त केले. आजचा हा अनोखा अनुभव देणारा आमच्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण ठरणार असल्याचा आनंद विद्यार्थिनीनी व्यक्त केला. अशा या सुंदर स्वंयशासन दिनाचे आयोजन करण्यात आले. स्वंयशासन दिनाच्या मुख्याध्यापिका म्हणून कु. हिना रहेमान जमादार, उपमुख्याध्यापिका बिबी मसिहा सय्यद नूरसे तर प्राथमिकच्या मुख्याध्यापिका म्हणून तस्मिया नसीर कुरेशी यांनी कार्यभार सांभाळला. उत्कृष्ट पाठ घेतलेल्या शिक्षकांचे व उत्कृष्ट कार्य केलेल्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले. शाळेमध्ये स्वयंशासन दिनाचे सर्व शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी जेवणाचा उत्तम असा आनंद घेतला. माध्यमिकच्या मुख्याध्यापिका सय्यदा खुतेजा बेगम खतीब यांनी विद्यार्थ्यांच्या आजच्या शिस्तबद्ध आयोजनाचे कौतुक केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रशालेतील शिक्षक जुबेर अत्तार, इम्तियाजपाशा जमादार, बांगी मो. हनिफ, लिपिक जमीर शिकलगर, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका जैनबबी कुरेशी, शिक्षकेत्तर कर्मचारी जोहरबाशा शेख, महेबूब जमादार, विजय कांबळे आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तनसीफा ढोबळे तर आभार बीबीमसीहा नूरसे या विद्यार्थिनीने मानले.

## रस्त्याच्या कामावरून सरपंचाला मारहाण, कन्नड तालुक्यातील माटेगावची घटना

**कन्नड (राहुल थेटे)** : माटेगाव (ता. कन्नड) येथील सरपंच युसूफ इस्माईल पटेल (वय ५७) यांना दलित वस्तीतील रस्त्याच्या कामावरून गावातीलच एका दाम्पत्याने मारहाण केली. ही घटना बुधवारी (२९ जानेवारी) रात्री आठच्या सुमारास माटेगावमध्ये घडली सरपंच युसूफ पटेल हे पत्नी फरजानासोबत राहतात. ते घरी असताना गावातीलच नासेर रमजानी शेख व त्याची पत्नी समिना त्यांच्याकडे आले. तुम्ही दलीत वस्तीतील रस्त्याचे काम का करत आहे, अशी विचारणा त्यांनी केली. सरपंच दोघांना समजावून सांगत त्यांनी शिवीगाळ करून चापटबुक्क्यांनी मारहाण करायला सुरुवात केली. गावातील लोक धावत आले. त्यांनी सरपंचांना वाचवले. सरपंचांनी देवगाव रंगारी पोलीस ठाण्यात नासेर शेख व त्याची पत्नी समिनाविरुद्ध तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार संजय काळे करत आहेत.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103


## पत्नीचा सासरच्या मंडळी विरोधात कन्नड शहर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल



**कन्नड (राहुल थेटे)** : पतीसह सासरच्यांनी छळ केल्याचा आरोप २६ वर्षीय विवाहितेने केला आहे. आपल्याला मूल होऊ नये म्हणून पतीसह सासरच्यांनी धमकावले. तू मला आवडत नाहीस, असे पती म्हणाला, तेव्हा तिला धक्काच बसला. पती व सासरच्यांनी मिळून तिला घरातून हाकलून दिले. कन्नड शहर पोलिसांनी या प्रकरणी तिच्या पतीसह सासरच्या ५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.ज्योती ज्ञानेश्वर गव्हाणे (वय २६, रा. गेवराई ताडा ता. छत्रपती संभाजीनगर, ह. मु. जवाहर कॉलनी, हिवरखेडा, कन्नड) या विवाहितेने या प्रकरणात तक्रार दिली आहे. तक्रारीत म्हटले आहे, की तिचे लग्न गेवराई तांडा येथील ज्ञानेश्वर सिताराम गव्हाणे याच्यासोबत २२ सप्टेंबर २०२० रोजी झाले होते. पती ज्ञानेश्वर, सासरे सिताराम, भाया गणेश, नणंद लताबाई, भाचा विजू बापू जाधव (सर्व रा. गेवराई तांडा) असे सर्व एकत्र राहत होते. सासरच्या लोकांनी लग्नानंतर वर्षभर तिला चांगले वागविले. नंतर घर बांधण्यासाठी पाच लाख रुपये घेऊन ये, अशी मागणी करत सासरचे लोक शिवीगाळ करून मारहाण करू लागले. मूल होऊ नये म्हणून पतीकडून प्रयत्न सुरू होते. त्यावर विवाहितेने विचारणा केली असता तो म्हणाला, की तू मला आवडत नाही... सासरे, भाया, नणंद व भाचा ज्ञानेश्वरचे आम्ही दुसरे लग्न करून देऊ. तू घरातुन निघून जा. तू येथे राहिलीस तर तुला जीवे मारून टाकू, अशी धमकी देऊ लागले. शिवीगाळ करून लाथा-बुक्क्यांनी मारहाण करून तिला घरातून हाकलून दिले, असे तक्रारीत म्हटले आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार नासेर खान करत आहेत.